**अमरावती महानगरपालिका, अमरावती**
**दिनांक 13.6.2023 रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**
**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक 89 -** अग्निशमन विभागातील कार्यरत स्थायी व कंत्राटी कर्मचारी यांना अमरावती महानगरपालिकेतर्फे विमा योजनेचा लाभ देण्याकरिता मा.सर्वसाधारण सभेची मंजुरात प्रदान करणेबाबत.

**ठराव क्रमांक 89 -** अग्निशमन विभागात सदयस्थितीत ४७ स्थायी कर्मचारी व ७१ कंत्राटी तत्वावरील असे एकुण ११८ कर्मचारी विविध पदावर कार्यरत आहेत. सदर कर्मचारी अमरावती महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रात व कार्यक्षेत्राबाहेर स्वतचा जीव धोक्यात घालुन आग विझवण्याचे तसेच इतरांचे प्राण वाचविण्याचे (रेस्क्यु ऑपरेशन) काम करतात. त्यामुळे त्यांचेबाबत अश्या ठीकाणी कोणतीही विपरीत घटना किंवा जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब,अग्निशमन विभागातील कार्यरत सर्व स्थायी व कंत्राटी कर्मचारी यांचे विमा असणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्यांचे पश्चात त्यांचे कुटुंबियांना आर्थिक स्थैर्य लाभेल. त्याकरिता भारतीय जीवन विमा महामंडळ, दी न्यु इंडीया अॅशुरन्स कंपनी तसेच इतर खाजगी बँकामध्ये कर्मचारी यांचे विमा योजनेबाबत चौकशी केली असता खाजगी बँकाव्दारे विमा लाभ देण्यात येत नाही. परंतु दी न्यु इंडीया अॅशुरन्स कंपनी सदर कर्मचा-यांना विविध योजनेच्या माध्यमातुन विमा लाभ देते.

दी न्यु इंडीया अॅशुरन्स कंपनी यांचेकडे कर्मचारी यांचे विमा योजनेबाबत चौकशी केली असता त्यांनी टर्म इन्शुरन्स (डीसॅबिलीटी सहीत) योजनेचे प्रस्ताव सादर केले आहेत. त्यानुसार एकुण ११८ कर्मचारी यांचे प्रति कर्मचारी रु. ५ लक्ष रक्कमेकरिताचे प्रिमीयम अमरावती महानगरपालिकेतर्फे सदयस्थितीत एका वर्षापर्यंत भरावयाचे आहेत.

तसेच भविष्यात अग्निशमन विभागात कर्मचारी यांचे संख्येत किंवा विमा प्रिमीयम रक्कमेमध्ये वाढ झाल्यास त्या वाढीस अनुसरुन सदर योजना दरवर्षी राबविण्यास मा.आयुक्त यांनी दि.१३/०६/२०२३ रोजी मंजुरात प्रदान केली आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेचे मंजुरी करिता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगर सचिव
अमरावती महानगरपालिका
अमरावती